Dr. M. A. Patil

ISBN : 978-81-931719-7-4

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्नित
जयवंत प्रतिष्ठान हुमगांव संचलित,

# आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

## शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन कोल्हापूर (सुवेक)

## ३१ वे व ३२ वे संयुक्त अधिवेशन

**शनिवार दि. १८ डिसेंबर व रविवार दि. १९ डिसेंबर, २०२१**

विषय : भारतातील सध्याचे आर्थिक संकट
पर्यटनाचे अर्थशास्त्र

# शिवार्थ

स्मरणिका २०२१

अंक २० वा



Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधन पेपर | | संशोधक | पान. क्र. |
|---|---|---|---|---|
| | स्वागताध्यक्ष मनोगत | : | प्र. प्राचार्य,डॉ. प्रमोद घाटगे | |
| | संपादकीय | : | प्रा. संजय ठिगळे | |
| | स्थानिक संपादक मनोगत | : | डॉ. संजय धोंडे | |
| | स्थानिक कार्यवाह मनोगत | : | डॉ. सुजित कसबे | |
| | सुयेक वार्षिक अहवाल | : | डॉ. एम. जी. पाटील | |
| | परिचय: अध्यक्ष, सुयेक ३१ वे वार्षिक अधिवेशन | : | | |
| | अध्यक्षीय भाषण | : | डॉ. अनिलकुमार वावरे | |
| | **विषय:भारतातील सध्याचे आर्थिक संकट** | | | |
| १ | कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि भारतीय कापड उद्योग | | *प्रा. डॉ. पी. एस. कांबळे<br>** डॉ. काशिनाथ तनंगे | १-८ |
| २ | भारत आणि सन १९९१ नंतरच्या आंतरराष्ट्रीय व्यापार तुटीची समस्या | | *डॉ. सी. आर. जाधव<br>** डॉ. राहुल शं. म्होपरे | ९-१३ |
| ३ | कोविड १९- चा भारताच्या शेती व औद्योगिक क्षेत्रावरील परिणाम : एक दृष्टीक्षेप | | *डॉ. एम.एस. सुर्यवंशी | १४-१८ |
| ४ | भारतीय अर्थव्यवस्थेवरील संकट: कोरोना | | *डॉ. धेडे डी. आर. | १९-२१ |
| ५ | कोरोना काळातील मानवी संसाधनाची दुरावस्था : अन्वयार्थ | | *प्रा. गजानन खामकर<br>** प्रा. किशोर सुतार | २२-२८ |
| ६ | कोविड-१९ काळातील भारतातील बेरोजगारी: एक गंभीर समस्या | | *डॉ. सोमनाथ काळे,<br>**डॉ.कैलास पाटील | २९-३१ |
| ७ | कोरोनाचे भारतातील कामगारवर्गावरील संकट | | *डॉ. दत्तात्रय शेडगे | ३२-३९ |
| ८ | कृषी विधेयक २०२० स्वरूप आणि अडचणी | | *डॉ. मोहन सदामते | ४०-४३ |
| ९ | जयसिंगपूर शहरातील मोबाईल विक्रीवरील कोविड-१९ चा परिणाम | | *डॉ. व्ही . बी . देवकर | ४४-४५ |
| १० | कोव्हिड-19-आणि शिक्षणाची सद्य:स्थिती | | *प्रा. डॉ. जयश्री चव्हाण | ४६-४८ |
| ११ | कोरोना काळातील शेती: आव्हाने व संधी | | *डॉ. अजित सूर्यवंशी | ४९-५३ |
| १२ | भारतील कापड उद्योग स्थिती, करणे व परिणाम | | *डॉ. लक्ष्मण करपे | ५४-५६ |
| १३ | कोविड-१९ उगम, प्रसार आणि आरोग्य व्यवस्था | | *श्री. रामचंद्र कवितके | ५७-६१ |
| १४ | कोरोनाचा उगम, प्रसार आणि बदलेते जागतिक संबंध | | *कु. पूजा शिर्के | ६२-६५ |
| १५ | कोरोना काळातील RBI चे मौद्रिक धोरण | | *डॉ. प्रमोद घाटगे | ६६-६९ |
| १६ | कोरोना काळातील महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची स्थिती | | *श्री. पुष्पेंद्र बिचकर | ७०-७३ |
| १७ | The Impact of Covid- 19 on Indian Meat Market | | *Prof. Sachin Nikam | ७४-७६ |
| १८ | Feasibility of Protocols for Restaurants during COVID-19 Pandemic | | *Mr. Ashish Bhasme<br>**Dr. Rajendra Jeur | ७७-८० |




Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | Need of Balanced Sectorial and Regional Development for Further India's Economic Planning | *Dr. Rajesh Gavit<br>**Dr. Mahesh Jadhav | ८१-८८ |
| २० | Revival of Top Ten Economies After Lockdown | *Dr. Anna Patil | ८९-९८ |
| २१ | Equal Distribution of Agricultural Land under Land Reforms Programme of India: An Unfinished Agenda | *Dr. Rajshekhar Nillolu | ९१-९३ |
| २२ | An Economic Impact of COVID-19 on Indian Economy. | *Ms. Himgauri Nanaware | ९३-१० |
| | **विषय: पर्यटनाचे अर्थशास्त्र** | | |
| १ | An Overview of Policy Framework and Institutional Support for Indian Tourism Industry | *Dr. Sanjay Omase | १० -१० |
| २ | Critical Issues and Sustainability of Agritourism in Maharashtra: A Baseline Study | *Dr. Vijay M. Kumbhar | १० -११ |
| ३ | Tourism and Rural Development: Study of Panhala, Jotiba and Kanerimath | *Dr. Sampada Tipkurle<br>**Mr.Rahul Bansode | ११ -११ |
| ४ | Scope and Problems of Agricultural Tourism in Satara District | *Dr. Sundar Potbhare | ११ -१२ |
| ५ | Fort Tourism in Satara District | *Dr. Rani Shinde | |
| ६ | Tourism Development of Mahabaleshwar and Panchgani | *Mr.Shabbir Nalband | १२ -१३ |
| ७ | Role of New Agricultural Technologies in Rural Development of Maharashtra | *Dr. Sachin Sardesai | १३ -१३ |
| ८ | महाबळेश्वर नगरपालिका प्रवासी कराचा एकूण कर उत्पन्नातील हिस्सा एक अभ्यास:(सन २०९९-१० ते २०१८-१९) | *डॉ. राजाराम कांबळे | १३ -१३ |
| ९ | भारतातील पर्यटन विकासाचे अर्थशास्त्र | *डॉ.रमजान मुजावर<br>**डॉ.दिनकर मोरे | १३ |
| १० | महाराष्ट्रातील पर्यटनाच्या संधी- एक आढावा | *प्रा. रोहिणी देशपांडे | १४ -१४ |
| ११ | पर्यटन एक विस्तार चाललेले सेवाक्षेत्र: एक दृष्टिक्षेप विस्तारत | *प्रा. रविंद्र कारंडे | १४ -१५ |
| १२ | कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास | *प्रा.एन. एन. गुरव | १५ -१५ |
| १३ | पर्यटनाचे आर्थिक घटकावरील परिणाम | *डॉ. अरुण जाधव | १५ -१५ |
| १४ | कोव्हीड -१९ टाळेबंदीचा नृसिंहवाडीच्या पर्यटन अर्थकारणावर झालेला परिणाम: एक चिकित्सक अभ्यास | *डॉ. मनोहर कोरे<br>**डॉ. प्रभाकर माने | १६ -१६ |
| १५ | पर्यटनातून आर्थिक विकास | *प्रा.डॉ. प्रशांत फडणीस<br>**प्रा.डॉ. विजय पोवार | १६ -१६ |
| १६ | कृषी पर्यटन:स्वयंरोजगाराची एक नवी संधी | *प्रा.डॉ.शिवाजी झांझुरणे | १६ -१६ |




Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | *' प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे | |
| १७ | पाचगणी पर्यटन स्थळ: अर्थशास्त्रीय अभ्यास | *डॉ. तुकाराम राबाडे | १६ -१७ |
| १८ | महाराष्ट्रातील पर्यटन विकासात आकलनाच्या अर्थशास्त्राची (Cognitive Economics) भूमिका | *डॉ. एन. ए. पाटील | १७ -१७ |
| १९ | भारतीय पर्यटन उद्योगाचा विकास | *डॉ. अशोक जाधव | १८ -१८ |
| २० | इस्लामपूर शहरातील नागरिकांचा पर्यटन विषयक दृष्टीकोन | *डॉ. प्रकाश बुरुटे | १८ -१९ |
| २१ | शाश्वत कृषी विकासासाठी कृषी पर्यटन | *डॉ. संजय धोंडे | १९ -१९ |
| २२ | कोरोना प्रभावित पर्यटन: आव्हाने व उपाय | *प्रा. नवनाथ इप्पर | १९ -२० |
| २३ | सांगली जिल्ह्यातील पर्यटनाचे बदलते अर्थकारण | *श्री. ऋतुराज ठिगळे<br>*प्रा. संजय ठिगळे | २० -२० |
| २४ | पर्यटन सेवा उद्योग रोजगार व राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा गुणक | *प्रा. प्रवीण डांगे<br>**डॉ. विजय पाटील | २० -२० |
| २५ | कृषी पर्यटन : काळाची गरज | *प्रा. डॉ. के .पी. वाघमारे | २० -२१ |




Scanned with OKEN Scanner

 ISBN: 978-81-931719...

# महाराष्ट्रातील पर्यटन विकासात आकलनाच्या अर्थशास्त्राची (Cognitive Economics) भूमिका

डॉ. एन. ए. पाटील
वेणूताई चव्हाण कॉलेज कराड

### प्रस्तावना

मानवाच्या उत्क्रांतीपासूनच माणसाच्या भटकंती सुरुवात झाली. मात्र ती अन्नाच्या, निवाऱ्याच्या शोधात होती. आर्थिक विकास जसजसा होत गेला तसें भटकंतीचे उद्देश बदलले. त्यामध्ये नवनवीन ठिकाणे पाहणे, निसर्गाचे सौंदर्य, वस्तुकला, देशाटन घडू लागले. यातून पर्यटन व्यवसायाचा जन्म झाला. साधारणपणे पहिल्या महायुद्धाच्या काळानंतर जगात पर्यटनाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. भारतामध्ये 18 व्या शतकापर्यंत परदेशागमनाबद्दल प्रायश्चित्त घ्यावे लागत असे. पण आज परदेशागमन हा कौतुकाचा विषय झाला आहे. पर्यटन हा एक संशोधनाचा, अभ्यासाचा व चिंतनाचा विषय होऊ लागला आहे. जगात आज पर्यटन हा एक महत्त्वाचा सेवा उद्योग बनला आहे. एका अभ्यासावरून सेवा उद्योगाच्या एकूण रोजगारापैकी 65% रोजगार पर्यटन व त्याला पूरक उद्योगातून निर्माण होऊ शकतो. यावरून पर्यटन उद्योगाचे महत्त्व लक्षात येते. पर्यटनाचा विचार करताना प्रथम पर्यटकाचा विचार करणे आवश्यक ठरते. त्यानुसार पर्यटकांची आकर्षणे विविध प्रकारात नोंदविली आहेत. त्यामध्ये धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थळे, वास्तू, राष्ट्रीय उत्सव, कला, संगीत, दंतकथा, सृष्टीसौंदर्य, उद्याने, अभयारण्ये, करमणूक, वस्तुसंग्रहालये, आल्हाददायक हवामान, आरोग्यधाम इत्यादी यादृष्टीने भारत या सर्वांचा खजिनाच आहे. पर्यटनास आवश्यक निसर्ग, त्यातील विविधता, ऐतिहासिक शहरे, वास्तू, सांस्कृतिक वारसा, विविधतेतील एकता यांचे प्रचंड आकर्षण पर्यटकांना आहे. परंतु भारतात पर्यटन उद्योगाची म्हणावी अशी जागृती झालेली नाही. मुलभूत सेवा सुविधांचा अभाव, योग्य धोरणात्मक निर्णयाचा अभाव, तसेच पर्यटन स्थळांची अयोग्य देखभाल, सुरक्षिततेचा अभाव, वाहतूक, राहण्याच्या सुविधांचा अभाव, पर्यटकांची फसवणूक अशा अनेक त्रुटी भारतातील तसेच पर्यायाने सर्व राज्याच्या पर्यटन धोरणात आहेत.

आकलनाच्या अर्थशास्त्राचे पर्यटन व्यवसायात उपयोजन करून या व्यवसायाला ऊर्जितावस्था आणली जाऊ शकते. आकलनाच्या अर्थशास्त्राचे उपयोजन कशा प्रकारे करता येईल यादृष्टीने या संशोधन लेखाचे प्रयोजन करण्यात आले आहे.

### अभ्यास पद्धती

प्रस्तुत शोधनिबंध प्रामुख्याने दुयम साधन सामग्रीवर आधारित असून पर्यटनाशी व वर्तनाचे अर्थशास्त्राशी संबंधित पुस्तके, ग्रंथ, नियतकालिके इत्यादी आधारभूत मानून तयार करण्यात आला आहे.

### अभ्यासाची उद्दिष्टे

1. प्रस्तुत शोधनिबंध पर्यटनाची सद्यस्थिती आणि त्यांच्यासमोर असणाऱ्या अडचणी अभ्यासण्याच्या हेतूने तयार करण्यात आला आहे.
2. शोधनिबंधात पर्यटन या सेवा उद्योगात आकलनाच्या अर्थशास्त्राचे उपयोजन केल्यास पर्यटन उद्योगाच्या विकासास कसा हातभार लागेल याचा ऊहापोह केला आहे.
3. शोधनिबंधात महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाच्या विकासात आकलनाच्या अर्थशास्त्राची भूमिका मांडण्यात आली आहे.

### भारतातील पर्यटन व्यवसाय

भारत हा विस्तृत आकार असलेला आणि विविधतेने नटलेला देश आहे. जगातील पर्यटकाला काहीना काही देण्याची क्षमता भारतात आहे. येथे पाहण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. भारताचे भौगोलिक स्थान, सांस्कृतिक व धार्मिक परंपरा देशात पर्यटन विकासास वाव मिळवून देणाऱ्या आहेत. प्राचीन लेण्या, किल्ले, स्मारके, बर्फाच्छादित गिरीशिखरे, सरोवरे, विलोभनीय समुद्रकिनारे, लोकसंगीत, लोककला, सण-उत्सव, निसर्गसौंदर्य यासारख्या अनेक गोष्टी भारतात पर्यटकांचे मन मोहवून टाकणाऱ्या आहेत.

भारतात पर्यटन उद्योगाच्या विकासाला ब्रिटिश काळात सुरुवात झाली. सन 1945 मध्ये सर जॉन सार्जंट यांचे अध्यक्षतेखाली पर्यटन उद्योगाच्या विकासाचा विचार करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार त्यानंतरच्या काळात पर्यटन उद्योगाच्या व्यवस्थापनात अनेक बदल करण्यात आले. सुरुवातीस पर्यटन विकासाची जबाबदारी वाहतूक मंत्रालयाकडे होती. नंतर स्वतंत्र पर्यटन विकास विभागाची स्थापना करण्यात आली. मात्र भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना झाल्यानंतर खऱ्या अर्थाने पर्यटन



Scanned with OKEN Scanner

 ISBN: 978-81-931719-7-4

उद्योगाच्या विकासाला चालना मिळाली. परंतु, अजूनही भारतात पर्यटन उद्योगाची म्हणावी तशी जागृती झाली नाही. पर्यटन उद्योगाच्या नियोजनाचा अभाव, धोरणात्मक निर्णयाच्या अंमलबजावणीचा अभाव, पर्यटनास आवश्यक असणाऱ्या मूलभूत सोयीसुविधांचा अभाव, पर्यटन स्थळांच्या पुरेशा माहितीचा अभाव, पर्यटन स्थळांची अयोग्य देखभाल, सुरक्षिततेचा अभाव, फसगत, आदरातिथ्याचा अभाव, स्वच्छतेचा अभाव इत्यादी समस्या या उद्योगास भेडसावत आहेत.

आंतरराष्ट्रीय पर्यटनाइतकेच देशांतर्गत पर्यटनासही महत्व आहे. याबाबतही अपेक्षित जनजागृती, जाहिरात, प्रसिद्धी दिल्याचे दिसून येत नाही. भारतात पर्यटन उद्योगाच्या विकासासाठी आकलनाच्या अर्थशास्त्राचा आधार घेऊन नियोजन करणे गरजेचे आहे. त्यामुळे या उद्योगाचा शास्त्रीय दृष्ट्या विकास घडून येण्यास मदत होईल.

**महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाची पार्श्वभूमी**

महाराष्ट्र हे एक वैभवशाली इतिहास असणारे राज्य आहे. भारताच्या दक्षिण मध्य भागात ते वसलेले आहे. देशाच्या पर्यटन उद्योगात महाराष्ट्र अग्रस्थानी असून दरवर्षी लाखो विदेशी पर्यटक महाराष्ट्राला भेट देतात. महाराष्ट्रात जागतिक किर्तीचे पुरातत्व अवशेष, प्राचीन मंदिरे, नयनरम्य समुद्रकिनारे, पर्वतीय स्थळे, घनदाट जंगले, विविध प्रकारचे वन्यजीव, आधुनिक शहरे, तंत्रज्ञानाने विकसित उद्योग, कारखाने, मोठी धरणे, गुहा, किल्ले, अभयारण्ये, गरम पाण्याचे झरे इत्यादी प्रचंड असा पर्यटन आकर्षणाचा खजिना महाराष्ट्रात आहे.

महाराष्ट्रात पर्यटन व्यवसायाला प्रचंड मोठा वाव आहे. महाराष्ट्रात पर्यटकांना आकर्षित करणारी विविध नैसर्गिक व मानवनिर्मित संसाधने आहेत. परंतु त्यांच्याकडे आपण व्यवसायिक पद्धतीने पाहिले नाही. त्यांच्या विषयीची माहिती प्रसारित करण्यात महाराष्ट्र राज्य कमी पडल्याचे दिसून येते. महाराष्ट्रास सह्याद्री सातपुडा पर्वतरांगांची देण लाभली आहे. या पर्वतरांगात पर्वतीय स्थळांची थंड हवेच्या ठिकाणांची रेलचेल आहे. पश्चिमेस 720 किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. या किनाऱ्यावर अनेक सुंदर बीच, धार्मिकस्थळे आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्राची भूमी छ. शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. त्यांचा पराक्रमी इतिहास, त्यांचे जवळपास 350 किल्ले संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेले आहेत. याबाबत स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटक अनभिज्ञ आहेत. मात्र याबाबत पर्यटकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.

महाराष्ट्रात पर्यटनाच्यादृष्टीने पुरातत्व व संस्कृतिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, धार्मिकस्थळे, आरोग्यधामे सुंदर व विलोभनीय ठिकाणे उपलब्ध आहेत.

महाराष्ट्रात जुनी व आधुनिक धरणे सुद्धा पर्यटकांच्या आकर्षणाची केंद्रे आहेत. त्यामध्ये राधानगरी, खडकवासला, भंडारदरा, मुळशी, पवई, उल्का निर्मित लोणार तलाव अशी अनेक धरणे, तलाव सांगता येतील. त्याचबरोबर महाराष्ट्रात विविध प्राणी व पक्षांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या अभयारण्याची संख्यांही मोठी आहे. महाराष्ट्राचे आणखी एक महत्वाचे आकर्षण म्हणजे गरम पाण्याचे झरे होय. वज्रेश्वरी, उन्हैर, साव, उनकेश्वर, दाराबीपूर अशा अनेक ठिकाणी गरम पाण्याचे झरे आढळतात. काही गरम पाण्याच्या झऱ्यातील पाणी आरोग्य समस्या दूर करण्यासाठी वापरले जाते.

महाराष्ट्र हे धार्मिक स्थळांचे आगरच आहे. हिंदू धर्मियांच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाच ज्योतिर्लिंगे महाराष्ट्रात आहेत. अष्टविनायक मंदिर, समर्थ रामदासांनी स्थापन केलेली अकरा मारुती मंदिरे, कोल्हापूर, वणी, तुळजापूर, माहूर ही साडेतीन शक्तीपीठे, देहू, आळंदी, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर ही वारकरी संप्रदायाची ठिकाणे, ज्ञानोबा - तुकारामांचा पालखी सोहळा व्यवस्थापनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. अक्कलकोट, औदुंबर, गाणगापूर, नृसिंहवाडी ही दत्तसंप्रदायाची ठिकाणे आहेत.

कृषी पर्यटन व औद्योगीकरण हे सुद्धा पर्यटनाचे एक महत्त्वाचे अंग आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने विकसित झालेली शेती व उद्योग हे पर्यटनाचा विषय ठरले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील साखर उद्योग, नाशिकची मिग विमान फॅक्टरी, ट्रॉबे येथील अॅटॉमिक एनर्जी सेंटर, रासायनी येथील हिंदुस्तान ऑरगॅनिक केमिकल्स फॅक्टरी, हिंजवडी येथील IT पार्क शिवाय ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सोलापूर ही औद्योगिक शहरे पर्यटकांना आकर्षित करत आहेत.

पर्यटनाच्यादृष्टीने विविधीकरण असणारे महाराष्ट्र हे एक महत्वाचे राज्य आहे. परंतु पर्यटनाबाबत धोरणात्मक निर्णयाचा अभाव, व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव, अपुरी माहिती, जाहिरातबाजी, पर्यटकांची सुरक्षितता, मूलभूत सेवा सुविधांचा अभाव इत्यादींमुळे महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांना जागतिक व राष्ट्रीय

Hospitality

 ISBN: 978-81-931719-7-4

पातळीवर म्हणावी अशी प्रसिद्धी मिळाली नाही. उत्पन्न व रोजगाराच्या दृष्टीने महाराष्ट्रात पर्यटन व्यवसाय विकसित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाच्या विकासात आकलनाच्या अर्थशास्त्राची भूमिका**

महाराष्ट्र राज्याचा विचार करता पर्यटन स्थळांचे आगर असणारे राज्य आहे असे म्हटले पाहिजे. पर्यटन स्थळांचे विविध प्रकारही राज्यात आढळून येतात. त्यामुळे पर्यटन हा एक महत्त्वाचा उद्योग म्हणून उदयास येऊ शकतो. मात्र महाराष्ट्रातील पर्यटन स्थळाबाबत राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय तसेच स्थानिक पातळीवर जाणीव जागृती झालेली नाही. तसेच पर्यटन स्थळांचा व्यावसायिक दृष्टिकोनातून विकास झालेला पाहायला मिळत नाही. सरकारच्या पातळीवर या उद्योगाबाबत निश्चित व दीर्घकालीन धोरण आढळून येत नाही. या सर्व पार्श्वभूमीवर जर पर्यटन व्यवसाय लोकचळवळ करता आला तर राज्याला स्थानिक व परकीय चलन मिळून जाईल, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन लोकांच्या राहणीमानात बदल होईल.

महाराष्ट्रात व देशात अशा अनेक योजना आहेत, ज्यामध्ये लोकांना मनापासून सहभागी करून घेतल्याने त्या योजना अतिशय यशस्वी ठरल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ केंद्र सरकारची स्वच्छ भारत मिशन, बेटी बचाव बेटी पढाओ योजना, महाराष्ट्रातील ग्रामविकास योजना इ. या योजना लोकांच्या मनामध्ये परिवर्तन करून यशस्वी केलेल्या योजना आहेत. यामध्ये आकलनाच्या अर्थशास्त्राच्या तंत्राचा वापर केल्याचे दिसून येते.

वर्तनाच्या अर्थशास्त्राची एक शाखा म्हणून आकलनाचे अर्थशास्त्र आज विकसित होत आहे. लोकांच्या मनामध्ये चाललेल्या विचारांचा किंवा लोकांच्या मनावर बिंबवलेल्या विचारांचा त्यांच्या निर्णय प्रक्रियेवर कसा परिणाम होतो याचा अभ्यास या अर्थशास्त्रात केला जातो. जाणीवपूर्वक लोकांच्या मनावर विशिष्ट विचार बिंबवल्यास त्या पद्धतीने लोकांची मने परिवर्तित होतात व त्याचा अपेक्षित परिणाम दिसून येऊ लागतो. या पार्श्वभूमीवर आकलनाच्या अर्थशास्त्राच्या तत्वांचा वापर करून पर्यटन व्यवसायास सेवा क्षेत्रातील मुख्य व्यवसाय बनवता आल्यास महाराष्ट्राच्या आर्थिक विकासास निश्चित हातभार लागेल.

पर्यटन विकासाच्या पहिल्या टप्प्यामध्ये स्थानिक लोक कोणत्या गोष्टीची भावनिकदृष्ट्या जोडले गेले आहेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची विभागणी प्रमुख चार भागात करता येईल. त्यामध्ये प्रथम छ. शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ले, वाडे, तलाव, विहिरी इत्यादी त्यानंतर महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे, निसर्ग पर्यटनस्थळे, त्यामध्ये समुद्रकिनारा, पर्वतरांगा, अभयारण्ये, जंगले, कृषी पर्यटन. भारतातील मध्ययुगीन काळातील गुहांपैकी 80% गुहा महाराष्ट्रात आहेत. तसेच औद्योगिक पर्यटनास ही महाराष्ट्रात मोठा वाव आहे. महाराष्ट्रातील किल्ले व धार्मिक स्थळांबाबत लोक भावनिकदृष्ट्या जोडले गेले आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी करण्यासाठी वर्तनाच्या अर्थशास्त्राचा आधार घ्यावा लागेल. मनावर या बाबी बिंबवण्यासाठी लोकांच्या भावनेला हात घालून जाहिरात करणे, धोरणात्मक निर्णय घेणे, विविध सवलतींचा योजना जाहीर करणे इत्यादीमुळे स्थानिक लोक पर्यटनास बाहेर पडतील. याला आपण 'मेंटल मॉडेल' असे म्हणू शकतो.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्याइतपत पर्यटनस्थळांचा खजिना महाराष्ट्रात आहे. परंतु त्याबाबत विदेशी पर्यटक व इतर राज्यातील पर्यटक अनभिज्ञ आहेत. येथे हां आपण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आकलनाच्या अर्थशास्त्राचा आधार घेऊ शकतो. राजस्थान सरकारच्या पर्यटन खात्याने त्यांच्या पर्यटन स्थळांच्या जाहिराती इतर राज्यांच्या स्थानिक टीव्ही चॅनेलवर स्थानिक भाषेत केल्याचे दिसून येते. या काळात विविध महोत्सवांचे आयोजन केले जाते. हा त्यांचा प्रयत्न पर्यटकांच्या मनापर्यंत पोहोचण्याचा आहे. त्याचा सकारात्मक परिणाम राजस्थानच्या पर्यटन व्यवसायावर झालेला आहे. महाराष्ट्राच्या पर्यटन विकास महामंडळानेही या पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेतल्यास त्याचा मोठा परिणाम पर्यटन विकासावर होईल.

बेटी बचाव बेटी पढाओ हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमाची सुरुवात पानिपत येथून केली त्यामागे दोन कारणे होती. एक म्हणजे 1526 मध्ये पानिपतची लढाई भारताच्या इतिहासात अजरामर आहे. दुसरे म्हणजे पानिपत हा देशातील मुलींचे प्रमाण सर्वात कमी असणारा जिल्हा होता. अशा पद्धतीने महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाच्या विकासाला अशा एखाद्या घटकाचा वापर करून गती देता येईल. महाराष्ट्र म्हटले की छ. शिवाजी महाराज

 ISBN: 978-81-931719-7-4

व त्यांचे सुमारे 350 किल्ले यातील महत्वाच्या एखाद्या किल्ल्यावरून पर्यटन योजनेस गती देण्याचे ठरविल्यास ते महाराष्ट्रातील पर्यायाने भारतातील लोकांसाठी मेंटल मॉडेल होईल. कोणत्याही कार्यक्रमाची, धोरणाची यशस्विता तेथे असते की जेथे सर्व संबंधित लाभार्थी त्यामध्ये सहभागी असतात व सामाजिक रूढी, शक्तीस्थळांचा प्रभावी वापर केला जातो. डॉ. रोबिनसनने म्हटले आहे की, पर्यटनातील पर्यटकाला मिळणाऱ्या विविध सुविधांचा, पर्यटन स्थळांचा तसेच पर्यटकांच्या मानसशास्त्राचा सुद्धा पर्यटन उद्योगाच्या विकासात अभ्यास करणे आवश्यक आहे. यानुसार एखाद्या पर्यटन स्थळाचा अभ्यास करताना फक्त तेथील भौगोलिक व सांस्कृतिक घटकांचा विचार न करता पर्यटकांचा आर्थिक, सामाजिक व मानसशास्त्रीय दृष्टीने विचार करणे महत्वाचे ठरते. महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाच्या विकासास याची गरज आहे.

## समारोप

महाराष्ट्र हे आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्ट्या पुढारलेले राज्य आहे. राज्यात नागरीकरणाचे प्रमाण 45% पेक्षा अधिक आहे. लोकांचा आर्थिक स्तर उंचावत आहे. म्हणजेच निर्वाह उत्पन्नापेक्षा लोकांना अधिक उत्पन्न मिळू लागले आहे. त्यामुळे लोकांना प्रवास करणे, पर्यटन करणे शक्य होत आहे. याचा फायदा राज्यातील पर्यटन विभागाने घेणे अत्यंत गरजेचे आहे. कारण महाराष्ट्र पर्यटन आकर्षणाचा खजिना आहे. परंतु त्याची म्हणावी अशी प्रसिद्धी नाही. आकलनाच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासातून काही तंत्राचा अवलंब करून स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्याच्या योजना आखल्या गेल्या पाहिजेत. तसेच पर्यटन स्थळांचा व्यावसायिक दृष्टिकोनातून विकास करणे, रस्ते, हॉटेल्स, इतर सेवा सुविधांचे चांगले नेटवर्क राज्यात उभे केल्यास पर्यटन व्यवसायावर त्याचा सकारात्मक परिणाम होऊन पर्यटन हा एक महाराष्ट्राचा मुख्य उद्योग बनेल.